दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप
उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उपसंपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

बीड महाराष्ट्र | रविवार, 21 जून 2026 |
अंक क्र. 47 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# परळीत दिवसाढवळ्या अपहरण ऊसतोडणीच्या 'उचल' पैशांवरून तरुणाला गाडीत टाकून पळवले!

## परळी शहर पोलिसांकडून ३ आरोपी गजाआड

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

परळी शहरात भरदिवसा एका तरुणाचे चारचाकी गाडीतून अपहरण करण्यात आल्याची थरारक घटना समोर आली आहे. ऊसतोडणीच्या कामासाठी घेतलेल्या उचल पैशांच्या वादातून हा गंभीर प्रकार घडला असून, परळी शहर पोलिसांनी २४ तासांच्या आत धडक कारवाई करत ६ पैकी ३ आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. या घटनेमुळे संपूर्ण परळी परिसरात गुन्हेगारांच्या वाढत्या धाडसाबाबत खळबळ उडाली आहे. मिळालेली माहिती अशी की, परळी येथील स्वाभिमाननगरचे रहिवासी विनोद नवनाथ वैरागे यांनी ऊसतोडणीच्या कामासाठी उचल पैसे घेतले होते. याच पैशांच्या आर्थिक व्यवहारावरून परभणी जिल्ह्यातील काही जणांशी त्यांचा वाद सुरू होता. शुक्रवारी (१९ जून) सकाळी ९:०० वाजण्याच्या सुमारास विनोद वैरागे हे परळीतील अरुणोदय मार्केट परिसरात आले होते. तिथे दबा धरून बसलेल्या आरोपींनी त्यांना गाठले आणि जुन्या वादावरून वाद घालण्यास सुरुवात केली. हा वाद इतका वाढला की, सर्व आरोपींनी संगनमत करून विनोद वैरागे यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण व शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. 'जीवे मारू' अशी धमकी देत आरोपींनी त्यांना बळजबरीने MH 46 AU 5981 या क्रमांकाच्या चारचाकी वाहनात डांबले आणि घटनास्थळावरून पोबारा केला.




### परभणीच्या टोळीवर गुन्हा ३ जण गजाआड

या भरदिवसा झालेल्या अपहरणाच्या घटनेनंतर राजू प्रल्हाद कांबळे (वय ३० वर्षे, रा. सोरंझा, जि. परभणी) यांनी परळी शहर पोलीस ठाण्यात रीतसर फिर्याद दिली. पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवत परभणी जिल्ह्यातील सायखेडा आणि निपाणी येथील ६ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला. यातील आप्पाराव उर्फ माऊली उजगरे, सचिन उजगरे, विश्वजित कदम, गिरीधर पुरी, दीपक चव्हाण आणि सचिन कदम यांच्यावर गुन्हे दाखल झाले असून, पोलिसांनी यातील तीन प्रमुख आरोपींना तातडीने ताब्यात घेतले आहे. परळी शहर पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा र. नं. १६०/२०२६ नुसार नवीन भारतीय न्याय संहितेच्या (B.N.S.) कलम १४०(३) (अपहरण), ११५(२), ३५१ आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. परळी शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पो.नि. नाचण साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शिंगणे हे या प्रकरणाचा पुढील सखोल तपास करत आहेत. फरार असलेल्या इतर आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत.



## अंबाजोगाईच्या होतकरू युवकाची अग्निवीरमध्ये घवघवीत भरारी; जिद्द, कष्ट आणि NCC च्या बळावर मिळवले यश

■ अंबाजोगाई प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील राजीव गांधी चौक परिसरातील वडार कॉलनी येथील सर्वसामान्य कुटुंबातील युवक उमेश रमेश देवकर याने स्वतःच्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर अग्निवीर भरतीत यश मिळवत अंबाजोगाईच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

उमेशचे वडील टिप्पर चालक (ड्रायव्हर) असून अत्यंत साध्या आणि कष्टकरी कुटुंबातून तो पुढे आला आहे. बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर तो प्लंबरचे काम करत असतानाच अग्निवीर भरतीची तयारी करत होता. विशेष म्हणजे कोणत्याही खासगी अकॅडमीचा आधार न घेता स्वतःच्या मेहनतीवर त्याने हे यश संपादन केले.

उमेशने दहावीपर्यंतचे शिक्षण नेताजी माध्यमिक विद्यालय, अंबाजोगाई येथे, तर अकरावी-बारावीचे शिक्षण खोलेश्वर उच्च माध्यमिक विद्यालय, अंबाजोगाई येथे पूर्ण केले. खोलेश्वर विद्यालयात घेतलेल्या NCC प्रशिक्षणाचा त्याला मोठा फायदा झाला आणि त्याच प्रशिक्षणाच्या बळावर त्याने अग्निवीर भरतीत यशस्वी मजल मारली.

उमेश देवकरच्या या यशामुळे त्याच्या कुटुंबासह संपूर्ण वडार कॉलनी आणि अंबाजोगाई शहरातून त्याचे कौतुक होत आहे. सर्वसामान्य कुटुंबातील युवकाने जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर मिळवलेले हे यश इतर तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. महाराष्ट्र वार्ता न्यूजकडून उमेश रमेश देवकर यांचे मनःपूर्वक अभिनंदन व उज्ज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा!

# सनशाईन पब्लिक स्कूलमध्ये पहिली पालक सभा उत्साहात

## विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वार्षिक नियोजनावर चर्चा; 'एक पालक, एक झाड' उपक्रमाला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

■ अंबाजोगाई : प्रतिनिधी

सनशाईन पब्लिक स्कूलमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाची पहिली पालक सभा मोठ्या उत्साहात आणि सकारात्मक वातावरणात पार पडली. या सभेला पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शाळेच्या वतीने करण्यात आलेल्या वार्षिक नियोजनाबाबत पालकांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी शाळेच्या शैक्षणिक उपक्रमांचे नियोजन, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक असलेल्या बाबी तसेच पालक आणि शिक्षक यांच्यातील समन्वयाचे महत्त्व यावर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यामध्ये शाळेसोबतच पालकांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. पालकांचे सहकार्य, नियमित संवाद आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा मार्ग अधिक मजबूत होतो, यावर सभेत विशेष भर देण्यात आला.

### 'एक पालक, एक झाड' उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

■ सनशाईन पब्लिक स्कूलच्या वतीने यावेळी 'एक पालक, एक झाड' हा विशेष पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांच्यामध्ये सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संरक्षण आणि निसर्गप्रेमाची भावना निर्माण करणे हे शाळेचे ध्येय असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या उपक्रमांतर्गत सभेला उपस्थित प्रत्येक पालकाला शाळेच्या वतीने एक रोपटे भेट देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या वाढीसोबत हे रोपटेही वाढावे आणि भविष्यात हिरवाईने समृद्ध वातावरण निर्माण व्हावे, असा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. पालकांनी शाळेच्या या अभिनव आणि पर्यावरणपूरक उपक्रमाचे मनापासून स्वागत केले. शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबरोबरच संस्कार, सामाजिक जाणीव आणि जबाबदारीची भावना रुजविण्याचे कार्य सुरू असल्याबद्दल पालकांनी समाधान व्यक्त केले.



संपादकीय

## शाळा प्रवेशोत्सव उत्साहात

४४ दिवसांच्या उन्हाळी सुट्टीनंतर राज्यातील शाळांमध्ये नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात 'शाळा प्रवेशोत्सव'च्या उत्साही वातावरणात झाली. शिक्षणाची गोडी निर्माण करत प्रत्येक बालकाला मुख्य प्रवाहात आणण्याचा शासनाचा हा उपक्रम राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या उद्दिष्टांना बळकटी देणारा ठरत आहे.

महाराष्ट्र राज्यात ४४ दिवसांच्या उन्हाळी सुट्टीनंतर १५ जून २०२६ पासून विदर्भातील शाळा वगळता उर्वरित महाराष्ट्रातील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा सुरु झाल्या आहेत. म्हणजे सन २०२६-२७ या नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात 'शाळा प्रवेशोत्सव'ने झाली. शाळा प्रवेशोत्सव उपक्रम गुजरात राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री आणि भारताचे विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २००३ पासून गुजरात राज्यात सुरू केला. हा प्रवेशोत्सव गुजरातमध्ये तीन दिवस साजरा केला जातो. तसेच महाराष्ट्रात २०२५ पासून शाळा प्रवेशोत्सव सुरु केला असून या उत्सवाचे यंदाचे दुसरे वर्ष आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे मुलांना शाळेची ओढ लागावी व शाळेविषयी आस्था निर्माण व्हावी, यासाठी शाळेच्या पहिल्या दिवशी मुलांचे स्वागत प्रभावी, दर्जेदार व उत्सुकतेने होण्यासाठी 'शाळा प्रवेशोत्सव' प्रसंगी मुलांचे स्वागत केले जाते.

यामध्ये शाळेत येणाऱ्या प्रत्येक मुलांना शाळा व्यवस्थापन, मुलांचे पालक आणि शाळेतील शिक्षक यांच्या प्रमुख उपस्थितीत मुलांचे शाळेतील 'पहिले पाऊल' या उपक्रमाचे उत्साहात स्वागत करण्यात येते. शाळेत येणाऱ्या प्रत्येक मुलांना गुलाबाचे फूल, पुस्तक, वह्या, शाळेचा गणवेश व गोड खाऊ देण्यात जरी आले तरी एका ताटात पाणी त्यामध्ये पिंजर घातली जाते. त्या पिंजरेच्या पाण्यात मुलांचे दोन्ही पायाचे तळवे भिजून मुलांना कागदावर उभे केले जातात. पानावरील मुलांच्या पायाचे ठसे वाळल्यानंतर ते पान पालकांकडे देतात. काही शाळांना लोकप्रतिनिधी आणि शिक्षणप्रेमींनी भेटी देऊन मुलांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन सर्वांनी उच्चविभूषित व्हावे असे आवाहन केले.

ज्याप्रमाणे मुलांना अभ्यासक्रमाचे वेळापत्रक शाळेत असते त्याप्रमाणे आपल्या मुलांना ज्यावेळी शाळेला सुट्टी असेल त्यावेळी स्वत: मुलांच्या अभ्यासाचे वेळापत्रक तयार करून त्यांना अभ्यासाला बसविणे जेणेकरून मुलांना अभ्यासाची नियमित सवय होण्यास मदत होते. शाळेला सुट्टी असल्यामुळे मुले अभ्यासाकडे दुर्लक्ष करतात. याचा परिणाम अभ्यास अपूर्ण राहतो. तेव्हा नियमित अभ्यासाची सवय मुलांना लावण्यासाठी पालकांना आपल्या मुलांच्या अभ्यासाचे वेळापत्रक तयार करावे लागेल. आजचे पालकसुद्धा उच्चशिक्षित आहेत. त्यामुळे त्यांना वेळापत्रक तयार करणे अधिक सुलभ होणार आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी झाल्यास विकसित महाराष्ट्र होण्याला वेळ लागणार नाही. शाळा प्रवेशोत्सवात पाऊस असता तर अधिक रंगत आली असती. मात्र अजूनही पावसाचा थांगपत्ता नाही. त्यामुळे मुलांना कडक उन्हाचा सामना करावा लागत आहे. आधीच कसेबसे वाढत्या तापमानाचा सामना करत उन्हाळी सुट्टी घालविली. वाढलेले तापमान व उष्माघाताचा धोका लक्षात घेऊन सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने सकाळच्या सत्रात ७.०० ते ११.१५ या वेळात ३० जूनपर्यंत शाळा भरविण्यात येणार आहेत.


अधूनमधून कुठे ना कुठे पाऊस जरी पडला तरी त्याचा फारसा फायदा नागरिकांना झालेला नाही. काही शेतकऱ्यांनी पावसाच्या पुढील आशेवर पेरणी केली मात्र पावसाने दडी मारल्यामुळे पुन्हा दुबार पेरणी करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. याचा जास्त ताण शेतकऱ्यांच्या शाळकरी मुलांवर होणार आहे. जर आपण शाळा प्रवेशोत्सवाचा विचार केल्यास राज्यातील मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळावे हा शासनाचा मुख्य उद्देश आहे. यामुळे मुलांचा बौद्धिक व मानसिक विकास योग्य वयात होऊन सर्वसमावेशक शिक्षण व्यवस्था निर्माण होऊ शकते. यामुळे सर्व मुले शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येऊन शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार आपल्या राज्यातील इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेण्यासाठी मुलांचे वय किमान ६ वर्षे असायला हवे. या वयात मुलांचा बौद्धिक आणि मानसिक विकास पूर्णपणे झालेला असतो. काही अपवादात्मक परिस्थिती असू शकते. बालकांच्या मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ हा संसदेने ४ ऑगस्ट २००९ रोजी संमत करून देशात १ एप्रिल २०१० पासून लागू करण्यात आलेला आहे. भारतीय राज्य घटनेच्या कलम २१-अ नुसार, ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला मोफत आणि सक्तीचे शिक्षण मिळण्याचा हा मूलभूत हक्क आहे. मुलांना मोफत शिक्षण राज्य सरकार देते. कोणतीही प्रवेश परीक्षा, मुलांच्या मुलाखती व विकास निधी घेण्यास पूर्णत: बंदी आहे. अध्यापक प्रशिक्षित असणे, शाळांमध्ये शाळांना अनुसरुन सुविधा असणे अनिवार्य आहे. बऱ्याचवेळा अनुदान लाटण्यासाठी बोगस विद्यार्थ्यांची पटसंख्या दाखविली जाते. तेव्हा प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी आधारकार्डची सक्ती केली आहे. त्यामुळे एकप्रकारे बोगस आकडेवारीवर आळा बसेल.

आर्थिक दुर्बल घटकातील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे व विधवा महिलांच्या मुलांना प्रवेश प्रक्रिया सुलभ करणे होय. असा शाळा प्रवेश प्रक्रियेतील शासनाचा मुख्य उद्देश आहे. मी शिक्षण घेत असताना राज्यात उन्हाळी सुट्टीनंतर शाळा सूर होण्यापूर्वी पावसाने सुरुवात केलेली असायची. त्यामुळे हवेत गारवा जाणवत असे. याचा परिणाम शाळेच्या पहिल्या दिवशी मुले अधिक उत्साहाने शाळेत जात असत. मी सुद्धा न विसरता पहिल्या दिवशी शाळेत जायचो. शाळा सुटल्यावर घरी येताना एकमेकांच्या अंगावर रस्त्यावरून वाहणारे पावसाचे पाणी शिंपडायचे. आता जरी छत्र्या असल्या तरी त्यावेळी छत्री नसल्यामुळे भिजतच घरी जायचो. पुस्तके प्लास्टिकच्या पिशवीत ठेवायचो. त्यावेळचे शाळेतील खरे जीवन आनंददायी होते. १५ जून रोजी शाळेच्या प्रांगणात शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा केला तरी उन्हाळी सुट्टीनंतर शाळा सुरु होऊन सुद्धा पावसाचा पत्ताच नाही. त्यामुळे कडक उन्हामुळे मुलांना शाळेतून घरी यावे लागत आहे. तेव्हा नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात शाळा प्रवेशोत्सवाने झाली तरी त्यात यशवंत होण्यासाठी विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास करावा लागेल.

# २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिवस : आरोग्यासाठी योगा, पारंपरिक खेळ व वृक्ष लागवड काळाची गरज

संयुक्त राष्ट्र परिषदेत प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांनी २१जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्याचा प्रस्ताव ठेवला होता.त्यानंतर ११ डिसेंबर २०१४ ला संयुक्त राष्ट्र महासभेने दरवर्षी २१ जूनला जागतिक योग दिन म्हणून मान्यता देण्याचे मान्य केले आणि २१ जून २०१५ ला पहिले आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरे केल्या गेले.योगाला भारत सरकारने जागतिक दर्जा देवून भारताची मान जगात उंचावली आहे याचे मी स्वागत करतो.योग व्यायामाचे आणि आरोग्याचे प्रभावशाली माध्यम असुन शरीरांच्या अवयवांचाच नव्हे तर मन,मेंदू आणि आत्म्याचे संतुलन ठेवण्याचे काम योगाच्या माध्यमातून होत असते.



योग ही भारतातील ५ हजार वर्षे जुनी परंपरा असुन शारीरिक,मानसिक आणि आध्यात्मिक साधना आहे.त्यामुळे ऋषी-मुनी, तपस्वी यांनी योग संस्कृती अवलंबली होती.आरोग्य रक्षणासाठी योगा व व्यायाम अती आवश्यक आहे.अत्याधुनिक युगात व बदलत्या काळानुसार मानवजातीला मनमोकळे पणाने बागडण्या करीता जागा किंवा ग्राउंड अपुरे पडताना दिसतात.कारण आधुनिक युगात आपण कुठेही नजर फिरवली तर आपल्याला गगनचुंबी इमारती, कारखाने, उद्योगधंदे मोठ्या प्रमाणात दिसुन येतात.अशा परीस्थितीत लहान-मोठी,आबाल-वृध्द खुल्या हवेत बागडु शकत नाही.परंतु शरीराला व्यायाम सुध्दा आवश्यक असतो. अशा वेळेला आपण योगा,व्यायाम शाळा व जिमचा सहारा घेवून शरीराला सुदृढ ठेवण्याचा प्रयत्न सर्व करतात. पुर्वी अनेक मातीतील खेळ खेळले जायचे व जखमा सुध्दा व्हायच्या परंतु या जखमा त्याच मातीने दुरूस्त सुध्दा व्हायच्या.अशा परीस्थितीत शरीराच्या प्रत्येक अवयवांचा व्यायाम होत असे. परंतु कालांतराने मोबाईलच्या छंदामुळे संपूर्ण जुने छोटे-मोठे खेळ लुप्त होतांना दिसतात.परंतू शारिर सुदृढ व निरोगी ठेवण्यासाठी व्यायाम अती आवश्यक आहे.योगाच्या सहाय्याने आपण घरबसल्या व्यायाम करू शकतो.आज जगातील १९० देशांनी योगाभ्यास अंगीकारला आहे.यात अनेक मुस्लिम राष्ट्र सुध्दा आहेत.हा भारताचा मोठा मान आहे.कारण समाजातील प्रत्येक कुटुंबातील लहान-मोठे योगाभ्यास करून आपले आरोग्य सुदृढ ठेवु शकतो.आजच्या परिस्थितीत मुल पुढील भविष्याच्या वाटचालीकरीता अभ्यात मग्न असतात आणि मनोरंजनाचे साधन म्हणून भारतासह जगातील ८० टक्के जनता मोबाईलच्या व कांम्पुटरच्या आदीन झाल्याचे दिसून येते. यामुळे डोक्यावर तान येणे,डोळे दुखने,मेंदुवर परीनाम होने इत्यादी अनेक विकार मोबाईलमुळे व कांपुटरमुळे होतांना आपण पहातो.परंतु यावर निराकरण करण्याचे काम योगा करणे,व्यायाम करणे,जिमनॅस्टिक,किंवा जिमच्या माध्यमातून शरिरयष्टी सुदृढ ठेवने अत्यंत गरजेचे आहे.आपण योगाभ्यासचा विचार केला तर भारतात अनेक युगानु- युगापासुन योगाभ्यास ऋषी-मुनी,साधु-संत, महायोगी,तपस्वी इत्यादी अनेक महान विभूती झाडाखाली योगसाधना करायची. परंतु आज वाढते प्रदुषण,धावपळीचे जीवन, ग्लोबल वार्मिंग, वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण व बदलते हवामान यामुळे खुला व्यायाम करण्यास अनेक अडचणी निर्माण होतात.परंतु योगाभ्यास चार भिंतींच्या आत सुध्दा करता येतो.त्यामुळेच जगातील अनेक देशांनी योगाभ्यासला जास्त महत्व दिले आहे.

भारताने योगाला जागतिक पातळीवर नेऊन भारत योगगुरू बनला आहे.त्याचप्रमाणे भारताने योगाभ्यास जागतिक पातळीवर नेऊन जगाला व्यायामाची व शरिर सुदृढ ठेवण्याची मोठी दीशा देण्याचे काम सुद्धा केले आहे.भारत जागतिक पातळीवर लोकांचे जीवन उंचावण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील रहाला आहे.योग दिनाच्या निमित्ताने सर्वांनीच योगाभ्यास अंगीकारला पाहिजे. योग दीनाच्या निमित्ताने प्रदुषणावर मात करण्यासाठी प्रत्येकांनी "घर तीथे झाड" ही मोहीम राबवुन या दीवसाला आगळेवेगळे ऐतिहासिक महत्व देवुन वृक्षारोपण केले पाहिजे. कारणआरोग्यासाठी वृक्ष ही सर्वांसाठी संजीवनी आहे. आपल्या राज्यात ३६ जिल्हे, प्रत्येकात साधारण ५ तालुके, म्हणजे १८० तालुके व राज्यात आमदार 288 (वि.परिषदचे वेगळेच) वृक्षारोपण हा मुद्दा आमदार-खासदार, कलेक्टर, बीडीओ,असे अनेक जबाबदार अधिकारी मिळून प्रशासनाने व सामाजिक संघटनांनी योग दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करायला हवी. जागतिक योग दिवस महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात साजरा होणार आहे. आजच्या परिस्थितीत ज्याप्रमाणे मनुष्याच्या आरोग्यासाठी योगाकरणे आवश्यक आहे.त्याच प्रमाणे ऑक्सिजनची मात्रा वाढविण्यासाठी वृक्षारोपण करने अत्यंत गरजेचे आहे.याकडे मुख्यत्वेकरून प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे.योग दिनाच्या निमित्ताने प्रशासने,शाळा, महाविद्यालये, एसटी स्टँड, संपूर्ण प्रशासकीय ठिकाणे, कारागृह या संपूर्ण ठिकाणी जागतिक योग दिनाच्या निमित्ताने वृक्षारोपण व्हायला हवे. यामुळे जागतिक विक्रम होईलच सोबत आरोग्याची जोपासना सुध्दा होईल.अशाप्रकारे योगासोबत आरोग्यासाठी वृक्षारोपण चळवळ पुढे नेली पाहिजे. कारण ह्या संपूर्ण बाबी आरोग्याशी निगडित आहे. योगाभ्यासमुळे शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक, आरोग्य आणि शांतीसाठी याचा मोठ्या प्रमाणात लाभ मिळतो. त्यामुळेच जगातील १९० देशांनी योगाला स्विकारले आहे. भारतातच नाही तर संपूर्ण जगात वाढते नवीन-नवीन आजार चिंतेचा विषय आहे.त्यामुळे योग साधना करून व्यायाम करणे तेवढेच आवश्यक आहे.कारण "आरोग्य हिच संपत्ती" हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारला पाहिजे. योग दिनाच्या निमित्ताने केंद्र सरकारने व राज्य सरकारने राष्ट्रीय खेळांना महत्व देवून व्यायाम करण्याची प्रवृत्ती जागृत करण्याची गरज आहे. जगातील प्राचीन संस्कृती भारतात आताही आहे. त्यामुळे आपल्याला योग परंपरेच्या माध्यमातून ती पहायला मिळते. त्यामुळे आज योगाभ्यास जगासाठी "अनमोल रत्न" व "संजिवनी" सिध्द होत आहे. याचा भारतीयांना अभिमान आहे. योग दिनाच्या निमित्ताने ऑक्सिजनची मात्रा वाढवीन्यासाठी आपण सर्वांनी वृक्षारोपणाचा "संकल्प" करावयास पाहिजे. कारण पुर्वी ऋषी मुनी,तपस्वी,महाग्यानी झाडाखालीच योगाभ्यास करायचे, त्याचप्रमाणे पुर्वी शिक्षण सुध्दा झाडाखालीच व्हायचे यावरून स्पष्ट होते की वृक्षा शिवाय पुढचे पाऊल अवघड असते. त्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने व योग दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्रासह भारतात जास्तीत जास्त वृक्षारोपण कसे करता येईल याकडे सरकारने, राजकीय पुढाऱ्यांनी व सामाजिक संघटनांनी लक्ष देण्याची गरज आहे. योगा करूया;व्यायाम करूया; वृक्ष लावुया; वृक्ष जगवुया आणि निसर्गाचा समतोल राखण्याचा संकल्प करूया.जय हिंद!जय भारत.

**लेखक : रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)



# योगप्रवास : स्त्रीच्या नवजीवनाचा नवीन प्रवाह : डॉ. सुवर्णा कराड

पन्नाशी जवळ येत असताना मला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली. आयुष्यभर मी सर्वांसाठी धावत राहिले. आई, पत्नी, सून, बहीण, कर्मचारी, समाजातील कार्यकर्ती अशा अनेक भूमिका पार पाडताना स्वतःसाठी वेळ खुप वेळा काढणे शक्य होत नाही पण घरातील प्रत्येकाच्या आरोग्याची काळजी घेत असतांनाच मात्र स्वतःच्या शरीराकडे आणि मनाच्या आरोग्याकडे अनेकदा दुर्लक्ष होते . मुलं मोठी झाली, जबाबदाऱ्या बदलल्या आणि शरीरानेही बदलांचे संकेत द्यायला सुरुवात केली. थकवा, पाठदुखी, झोपेच्या समस्या, चिडचिड, एकाकीपणा आणि मानसिक ताण यांचा अनुभव येऊ लागला. अशा वेळी योग माझ्या आयुष्यात आला आणि मला स्वतःकडे नव्याने पाहण्याची दृष्टी मिळाली.



आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने पन्नाशीतील महिलांनी आपले आरोग्य स्वस्त निरोगी कसे ठेवता येईल याचा विचार करणे आवश्यक आहे. योग हा केवळ व्यायामाचा प्रकार नाही. तो शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा यांना जोडणारी भारतीय जीवनपद्धती आहे. हजारो वर्षांची परंपरा लाभलेल्या या ज्ञानपद्धतीने आज जगभरातील कोट्यवधी लोकांना निरोगी जीवनाची दिशा दिली आहे. विशेषतः पन्नाशीतील महिलांसाठी योग हा आरोग्य, आत्मविश्वास आणि मानसिक संतुलनाचा महत्त्वपूर्ण आधार बनू शकतो.

स्त्रीच्या आयुष्यातील पन्नाशी हा केवळ एक आकडा नसतो. तो बदलांचा, अनुभवांचा आणि आत्मपरीक्षणाचा काळ असतो. या वयात रजोनिवृत्तीची प्रक्रिया सुरू असते. शरीरातील संप्रेरकांमध्ये होणारे बदल आरोग्यावर परिणाम करू लागतात. वजन वाढणे, सांधेदुखी, हाडांची झीज, मधुमेह, रक्तदाब, थायरॉईड विकार, झोपेच्या समस्या, अस्वस्थता, चिंता आणि नैराश्य यांसारख्या समस्या अनेक महिलांना जाणवू लागतात. याच काळात मुलं शिक्षण किंवा नोकरीसाठी घराबाहेर पडलेली असतात. अनेक महिलांना स्वतःची भूमिका बदलल्याची जाणीव होते. आयुष्यभर इतरांसाठी जगलेल्या स्त्रीसमोर अचानक स्वतःचा प्रश्न उभा राहतो. या टप्प्यावर योग शरीर आणि मन दोन्हींचा आधार बनतो.

भारतीय महिलांचे वास्तव पाहिले तर त्यांच्या आरोग्याच्या समस्या केवळ वैद्यकीय नसून सामाजिक आणि आर्थिकही आहेत. ग्रामीण भागातील महिला शेती, जनावरे, घरकाम आणि कुटुंब यांचा मोठा भार पेलत असतात. शहरी भागातील महिला नोकरी, प्रवास, घर आणि मुलांच्या जबाबदाऱ्या सांभाळताना स्वतःसाठी वेळच काढू शकत नाहीत. अनेक महिलांना आर्थिक स्वातंत्र्य नसते. काहींना विधवापण, एकल जीवन किंवा वृद्धापकाळातील असुरक्षिततेला सामोरे जावे लागते. अनेक घरांमध्ये स्त्रीच्या आरोग्याचा विचार ती गंभीर आजारी पडेपर्यंत केला जात नाही. मानसिक आरोग्याबाबत तर अजूनही पुरेशी जागरूकता दिसून येत नाही. परिणामी तणाव, चिंता, भावनिक दडपण आणि एकाकीपणा यांचा प्रभाव तिच्या जीवनावर पडत राहतो.

आजच्या महिलांसमोर तणावाची अनेक कारणे आहेत. मुलांच्या शिक्षणाची आणि करिअरची चिंता, वृद्ध पालकांची जबाबदारी, वाढती महागाई, आर्थिक असुरक्षितता, कौटुंबिक मतभेद, बदलती सामाजिक मूल्ये आणि नातेसंबंधांतील गुंतागुंत यामुळे मनावर सतत ताण असतो. पन्नाशीत अनेक महिलांना रिकाम्या घरट्याची भावना जाणवते. घरातील गजबज कमी होते. काही महिलांना निवृत्तीनंतर आपली ओळख हरवल्यासारखी वाटते. या परिस्थितीत योग, प्राणायाम आणि ध्यान मानसिक आधार देतात. श्वासावर लक्ष केंद्रित करण्याची साधी प्रक्रिया देखील मनातील अस्वस्थता कमी करते. मन शांत होते, विचार स्पष्ट होतात आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक बनतो.

योगामध्ये विविध प्रकारची आसने आहेत. ताडासन शरीराची ठेवण सुधारते आणि संतुलन वाढवते. वृक्षासन एकाग्रता वाढवते आणि पायांचे स्नायू मजबूत करते. त्रिकोणासन शरीराची लवचिकता वाढवते. भुजंगासन पाठीच्या स्नायूंना बळकटी देते आणि पाठदुखी कमी करण्यास मदत करते. अर्धमत्स्येंद्रासन पचनक्रिया सुधारण्यास उपयुक्त ठरते. वज्रासन पचनासाठी लाभदायक आहे. सेतूबंधासन पाठ, मान आणि कंबर मजबूत करते. शवासन शरीराला आणि मनाला संपूर्ण विश्रांती देते. योगनिद्रा तणावमुक्तीचा प्रभावी मार्ग मानली जाते. सूर्यनमस्कार हा सर्वांगिण व्यायाम असला तरी पन्नाशीनंतर तो वैयक्तिक क्षमतेनुसार आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली करणे योग्य ठरते.

आसनांइतकेच प्राणायाम आणि ध्यान महत्त्वाचे आहेत. अनुलोम-विलोम, भ्रामरी, उज्जायी आणि दीर्घ श्वसन या प्राणायाम प्रकारांमुळे शरीराला अधिक प्राणवायू मिळतो. रक्तदाब नियंत्रणात राहण्यास मदत होते. मेंदू अधिक सक्रिय आणि शांत राहतो. ध्यानामुळे विचारांची गर्दी कमी होते. भावनिक स्थैर्य वाढते. आत्मस्वीकृतीची भावना निर्माण होते. आधुनिक मानसशास्त्र आणि वैद्यकीय संशोधनही योग व ध्यानाच्या सकारात्मक परिणामांना मान्यता देत आहे.

योगाचे फायदे अनेक स्तरांवर दिसून येतात. शारीरिकदृष्ट्या शरीराची लवचिकता टिकून राहते, स्नायू मजबूत होतात, हाडांची झीज कमी होण्यास मदत मिळते, रक्ताभिसरण सुधारते आणि झोपेची गुणवत्ता वाढते. मधुमेह, रक्तदाब आणि स्थूलता यांसारख्या जीवनशैलीजन्य विकारांवर नियंत्रण ठेवण्यास मदत होते. मानसिकदृष्ट्या आत्मविश्वास वाढतो, चिंता आणि नैराश्य कमी होते, मन अधिक स्थिर होते आणि सकारात्मकता वाढते. सामाजिकदृष्ट्याही योग महत्त्वाचा आहे. सामूहिक योगवर्गांमुळे महिलांना संवादाचे व्यासपीठ मिळते. मैत्री वाढते. एकाकीपणा कमी होतो. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे योग महिलांना स्वतःशी पुन्हा जोडतो. आयुष्यभर इतरांसाठी जगलेल्या स्त्रीला स्वतःच्या अस्तित्वाची नव्याने जाणीव करून देतो.

तथापि, योग करताना काही काळजी घेणे आवश्यक आहे. योग हा चमत्कारिक उपचार नसून जीवनशैलीचा भाग आहे. त्यामुळे त्याचे परिणाम हळूहळू दिसून येतात. चुकीच्या पद्धतीने किंवा अतिरेकी सराव केल्यास दुखापती होऊ शकतात. हृदयविकार, गंभीर गुडघेदुखी, मणक्याचे विकार किंवा ऑस्टिओपोरोसिस असलेल्या महिलांनी वैद्यकीय सल्ला आणि प्रशिक्षित योगतज्ज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे. सुरुवातीला सोप्या आसनांपासून सुरुवात करावी. शरीराला वेदना होत असतील तर जबरदस्ती करू नये. नियमितता, संयम आणि सातत्य हे योगातील यशाचे मूलमंत्र आहेत.

आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करताना आपण एक महत्त्वाचा प्रश्न स्वतःला विचारला पाहिजे. योग वर्षातून एकदाच करायचा उत्सव आहे की रोजच्या जीवनाचा भाग? खरे पाहता योग ही दैनंदिन जीवनशैली बनली पाहिजे. गावोगावी महिला मंडळे, बचतगट, ज्येष्ठ नागरिक संघ, महाविद्यालये आणि सामाजिक संस्था यांच्या माध्यमातून नियमित योगवर्ग सुरू होणे आवश्यक आहे. शासनाने महिलांच्या आरोग्य धोरणात योग आणि मानसिक आरोग्य यांचा अधिक व्यापक समावेश करावा. डिजिटल माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांपर्यंत योग प्रशिक्षण पोहोचविण्याचे प्रयत्न वाढवावेत. शालेय स्तरापासून मुलींमध्ये योगाची सवय निर्माण झाली तर भविष्यात अधिक निरोगी समाज घडू शकतो. आंतरराष्ट्रीय योग दिन हा केवळ उत्सवाचा दिवस नाही; तो प्रत्येक महिलेने स्वतःकडे नव्याने पाहण्याचा दिवस आहे. पन्नाशी म्हणजे आयुष्याचा शेवट नव्हे, तर नव्या पर्वाची सुरुवात आहे. या टप्प्यावर शरीराला आरोग्य, मनाला शांतता आणि जीवनाला सकारात्मक दिशा देणारा योग हा एक विश्वासू सहप्रवासी ठरू शकतो. आयुष्यभर कुटुंबासाठी, समाजासाठी आणि इतरांसाठी जगलेल्या प्रत्येक महिलेने आता स्वतःसाठी काही क्षण राखून ठेवण्याची गरज आहे. कारण निरोगी स्त्री म्हणजे निरोगी कुटुंब, निरोगी समाज आणि निरोगी राष्ट्र. योगाचा खरा संदेश हाच आहे आणि आंतरराष्ट्रीय योग दिनाचे खरे महत्त्वही याच विचारात सामावलेले आहे.

**डॉ. सुवर्णा कराड, प्रदेशाध्यक्ष, वंजारी महासंघ, महिला आघाडी, महाराष्ट्र राज्य.**

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# कलामयी आर्ट क्लासेसच्या तिसऱ्या कला प्रदर्शनाचे नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी यांच्या हस्ते झाले उद्घाटन









## कला प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद ; विद्यार्थ्यांच्या कलाकृतींनी वेधले लक्ष





परळी वैजनाथ | प्रतिनिधी

परळी शहरातील कला आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणाऱ्या मैथिली लोंढे यांच्या कलामयी आर्ट क्लासेस आयोजित तिसऱ्या भव्य कला प्रदर्शनास नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. दोन दिवस चालणाऱ्या या कला प्रदर्शनाचे उद्घाटन परळीच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी भाजप नेत्या डॉ. शालिनी कराड यांची प्रमुख उपस्थिती होती.

काळाराम मंदिर, आंबेवेस, परळी वैजनाथ येथे 20 व 21 जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी साकारलेल्या विविध कलाकृती आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहेत. 'रंग, कल्पना आणि सर्जनशीलतेचा सुंदर संगम' या संकल्पनेवर आधारित प्रदर्शनात चित्रकला, रेखाटन, क्रिएटिव्ह आर्ट, विविध पेंटिंग्ज, व्यक्तिचित्रे (पोर्ट्रेट), रंगोळी तसेच इतर अनेक कलाकृतींचा समावेश करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेतून साकारलेल्या या कलाकृती पाहण्यासाठी कला रसिक, पालक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत.

यासोबतच कलामयी आर्ट क्लासेसच्या वतीने रविवारी (दि. 21 जून) चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. इयत्ता 5 वी ते 7 वी आणि 8 वी ते 10 वी अशा दोन गटांमध्ये ही स्पर्धा होणार असून अंतराळ संशोधन, एक झाड-चार ऋतू, पाण्याखालील दृश्य, प्रेरणादायी व्यक्तीचे व्यक्तिचित्र, माझ्या आवडत्या खेळाचे दृश्य तसेच गाव व ग्रामीण जीवन अशा विविध विषयांचा समावेश करण्यात आला आहे. स्पर्धेतील प्रत्येक गटातून तीन विजेत्यांची निवड करण्यात येणार असून त्यांना आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन  कलामयी आर्ट क्लासेस संचालिका मैथिली लोंढे यांनी  केले आहे. कलेची आवड जोपासणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मेहनतीला प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या कलागुणांना योग्य व्यासपीठ उपलब्ध व्हावे, या उद्देशाने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रदर्शनासाठी प्रवेश विनामूल्य असून नागरिकांनी प्रदर्शनाला भेट देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## लोकार्थ

# वॉटरवेज लेझर टुरिझमचा आयपीओ २३ जून, रोजी विक्रीसाठी खुला









वॉटरवेज लेझर टुरिझमने आपल्या पहिल्या इनिशियल पब्लिक ऑफरसाठी प्रत्येकी ₹१०/- दर्शनी मूल्याच्या इक्विटी शेअरमागे ₹७६९/- ते ₹८०८/- असा किंमत पट्टा निश्चित केला आहे.

कंपनीचा प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव ("आयपीओ" किंवा "इश्यू") वर्गणीसाठी २३ जून, २०२६ रोजी खुला होईल आणि २५ जून, २०२६ रोजी बंद होईल.गुंतवणूकदार किमान १८ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर १८ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात.आजपर्यंत एकूण ६५१,५४४,४४० इक्विटी शेअर्स, प्रत्येकाची किंमत रु. १०/- आहे.हा आयपीओ रु. ५८५ कोटींपर्यंतचा एक नवीन इश्यू आहे.या नवीन इश्यूमधून मिळणाऱ्या रकमेपैकी रु. ४८० कोटींचा वापर कंपनीची स्टेप-डाउन उपकंपनी, बेक्रूझ शिपिंग अँड लीजिंग (आयएफएससी) प्रायव्हेट लिमिटेड (बेक्रूझ आयएफएससी) हिच्या लीज भाड्यासाठी आणि मासिक लीज पेमेंटसाठी ठेव/अग्रिम रक्कम भरण्यासाठी केला जाईल, तर उर्वरित रक्कम सामान्य कॉर्पोरेट उद्देशांसाठी वापरली जाईल.

### भारत-बेलारूस व्यावसायिक मंचाचे आयोजन

भारत आणि बेलारूस यांच्यातील द्विपक्षीय व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि औद्योगिक सहकार्य अधिक दृढ करण्याच्या संधी शोधण्यासाठी वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबई येथे भारत-बेलारूस व्यावसायिक मंच आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये सरकारी अधिकारी, राजनयिक, उद्योगपती, बँकर आणि व्यावसायिक प्रतिनिधी एकत्र आले होते.

मुंबईतील बेलारूस प्रजासत्ताकाचे महावाणिज्यदूत श्री. अलेक्झांडर मात्सुको म्हणाले, "भारत आणि बेलारूसमध्ये दीर्घकाळापासून मैत्री असून, १९९२ मध्ये राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले आहेत. गेल्या काही वर्षांत, आमचे सहकार्य व्यापारापलीकडे जाऊन संस्कृती, शिक्षण, आरोग्यसेवा, तंत्रज्ञान आणि लोकांमधील देवाणघेवाण या क्षेत्रांपर्यंत विस्तारले आहे. बेलारूस भारताला एक महत्त्वाचा सामरिक भागीदार मानतो आणि आमचा विश्वास आहे की हा मंच दोन्ही देशांतील व्यवसायांना भागीदारी, गुंतवणूक आणि दीर्घकालीन सहकार्य शोधण्यासाठी महत्त्वपूर्ण संधी निर्माण करेल."

### न्यूट्रिफाय टुडे सी-सूट समफ्लेक्स २०२६ संपन्न

न्यूट्रिफाय टुडेच्या सी-सूट समफ्लेक्सची पाचवी आवृत्ती मुंबईत संपन्न झाली, ज्यामुळे न्यूट्रास्युटिकल उद्योगातील सर्वात प्रभावशाली नेतृत्व संमेलन म्हणून तिचे स्थान अधिक पक्के झाले आहे. या मंचाला प्रतिनिधींकडून वाढत्या प्रमाणात "न्यूट्रास्युटिकल्सचे दावोस" असे संबोधले जात आहे.  दोन दिवसांत जागतिक फार्मा, नियमन, व्हेंचर कॅपिटल आणि घटक विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील १५० हून अधिक सी-सूट नेते एकाच प्रश्नावर एकत्र आले:.काही वर्षांपूर्वी भारतीय हितधारकांसाठी एक-खोलीतील संवाद म्हणून सुरू झालेला हा उपक्रम आता एका जागतिक निर्णय-प्रक्रिया मंचाच्या रूपात विकसित झाला आहे. या वर्षीच्या सहभागींची यादी आरोग्य क्षेत्रातील दिग्गजांचीच होती आणि त्यांनी संचालक मंडळापासून ते उत्पादनाच्या तपशिलापर्यंत (बिल ऑफ मटेरियल्स) संपूर्ण मूल्य साखळीला एकाच खोलीत एकत्र आणले.यामध्ये नोवो नॉर्डिस्क, एमएसडी, मॅनकाइंड फार्मा, टॉरेंट फार्मा, डॉ. रेड्डीज-नेस्ले हेल्थ सायन्स, रेकिट आणि सनोफी यांसारख्या जागतिक फार्मा कंपन्या; एफएसएसएआय, एफडीए महाराष्ट्र, इंडियन फार्मास्युटिकल अलायन्स आणि ओपीपीआय येथील नियामक व धोरणात्मक क्षेत्रातील व्यक्ती; फायर साइड व्हेंचर्स आणि पीक ब्रिज व्हीसी यांसारखे गुंतवणूकदार; सहभाग होता.

### अॅडविट ज्वेल्स लिमिटेडचा आयपीओ उद्या खुला होणार

अॅडविट ज्वेल्स लिमिटेडने आपल्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरसाठी (आयपीओ) प्रत्येकी रु. १०/- दर्शनी मूल्य असलेल्या इक्विटी शेअरसाठी प्रति शेअर रु. १३०/- ते रु. १३८/- चा किंमत पट्टा निश्चित केला आहे. कंपनीचा प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव ("आयपीओ" किंवा "इश्यू") मंगळवार, २३ जून, २०२६ रोजी वर्गणीसाठी खुला होईल आणि गुरुवार, २५ जून, २०२६ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान १०० इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर १०० इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात. आजपर्यंत एकूण ३,३८,४२,००० इक्विटी शेअर्स (प्रत्येकी १० रुपये दर्शनी मूल्याचे) उपलब्ध आहेत.हा आयपीओ १,१९,६८,००० इक्विटी शेअर्सचा नवीन इश्यू आहे.या नवीन इश्यूमधून मिळणारा ६५ कोटी रुपयांचा निधी कंपनीच्या वाढीव खेळत्या भांडवलाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी, घेतलेल्या काही थकीत कर्जांची पूर्ण किंवा अंशतः परतफेड/पूर्व-परतफेड करण्यासाठी आणि सर्वसाधारण कॉर्पोरेट उद्देशांसाठी वापरला जाईल.

**संकलन –संयोजन  : सुबोध रणशेवरे**

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, रविवार 21 जून 2026
Last page

# परळी वैजनाथमध्ये धाडसी चोरी; स्टेट बँकेसमोरील 'सचिन किराणा' दुकान फोडून रोकडसह पेन ड्राईव्ह लंपास!

परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

शहर व परिसरात चोऱ्यांचे सत्र सुरूच असून, परळी शहरातील गांधी मार्केट परिसरातील स्टेट बँक ऑफ इंडिया समोर असलेल्या 'सचिन किराणा' या दुकानात अज्ञात चोरट्याने धाडसी चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. चोरट्याने दुकानाचा दरवाजा तोडून आत प्रवेश करत रोख रकमेसह व्यावसायिकदृष्ट्या महत्त्वाचा डेटा असलेला पेन ड्राईव्ह लंपास केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवार दिनांक २० जून २०२६ रोजी पहाटे अंदाजे २ वाजून २० मिनिटांच्या सुमारास ही चोरीची घटना घडली. दुकानाचे मालक सचिन सांबाप्पा लांडगे यांनी दिलेल्या तक्रार अर्जानुसार, अज्ञात चोरट्याने दुकानाचा कडी-कोयंडा अथवा दरवाजा तोडून आत प्रवेश केला. चोरट्याने गल्ल्यातील अंदाजे १५,००० ते २०,००० रुपयांची रोकड चोरून नेली. या रोकडमध्ये ५० व १०० रुपयांच्या नोटा, काही फाटक्या नोटा तसेच १० आणि २० रुपयांच्या नाण्यांचा समावेश होता.

**डिजिटल माहिती व महत्त्वाचे दस्तऐवज चोरीला**

केवळ रोकडच नव्हे, तर चोरट्याने दुकानातील ६४ GB क्षमतेचा एक पेन ड्राईव्ह देखील चोरून नेला आहे. या पेन ड्राईव्हमध्ये सचिन किराणा दुकानाच्या व्यवसायाशी संबंधित अत्यंत महत्त्वाचे कागदपत्रे आणि डिजिटल माहिती संग्रहित करण्यात आली होती. त्यामुळे दुकानदाराचे मोठे व्यावसायिक नुकसान होण्याची भीती वर्तवली जात आहे.

**सीसीटीव्ही फुटेज आले समोर**

या संपूर्ण चोरीच्या घटनेचे सीसीटीव्ही (CCTV) फुटेज उपलब्ध झाले असून, ते परळी शहर पोलिसांकडे सुपूर्द करण्यात आले आहे. फुटेजमध्ये चोरी करणारी व्यक्ती स्पष्टपणे दिसून येत आहे; मात्र चित्र काहीसे अस्पष्ट (Blur) असल्याने संशयित आरोपीची ओळख पटवण्यात अडचणी येत आहेत. असे असले तरी सदर सीसीटीव्ही फुटेज पोलिसांच्या तपासासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

याप्रकरणी दुकान मालक सचिन सांबाप्पा लांडगे यांनी परळी शहर पोलीस ठाण्यात रीतसर अर्ज देऊन तक्रार नोंदवली आहे. पोलीस ठाणे अमलदार यांनी २० जून २०२६ रोजी या तक्रार अर्जाची दखल घेतली आहे. या घटनेचा सखोल तपास करून चोरट्याचा त्वरित शोध घ्यावा आणि चोरीला गेलेला माल व महत्त्वाचा डेटा असलेला पेन ड्राईव्ह हस्तगत करून योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी व्यावसायिक आणि स्थानिक नागरिकांमधून केली जात आहे. परळी शहर पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.




# परळीत जुन्या वादातून जीवघेणा हल्ला
## राजगड हॉटेलसमोरील घटनेत ४ जणांवर गुन्हा दाखल!

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

परळी शहरातील राजगड हॉटेल अँड बिअर बार रोडवर जुन्या वादाच्या कारणावरून एका तरुणावर लोखंडी कत्ती आणि रॉडने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात चार जणांविरुद्ध विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक २० जून २०२६ रोजी दुपारी २:०० वाजण्याच्या सुमारास राजगड हॉटेल आणि बिअर बार रोड परिसरात ही घटना घडली. फिर्यादी पवन संगमेश्वर फुटके (वय ३३ वर्षे, रा. शास्त्रीनगर, परळी वैजनाथ) यांना आरोपींनी संगनमत करून जुन्या वादाच्या कारणावरून अडवले. त्यानंतर आरोपींनी त्यांना शिवीगाळ करत चापटाने मारहाण करण्यास सुरुवात केली.

हा वाद एवढ्यावरच थांबला नाही, तर फिर्यादीला जीवे मारण्याच्या उद्देशाने आरोपींनी लोखंडी कत्ती आणि लोखंडी रॉडने




त्यांच्यावर गंभीर हल्ला केला. दरम्यान, तिथे उपस्थित असलेल्यांनी भांडण सोडवण्याचा प्रयत्न केला असता, आरोपींनी त्यांनाही शिवीगाळ केली.

**गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे:**

- १) अनंत गणेश ढोपरे
- २) संतोष जीवनराव शिंदे
- ३) अभिजित गणेश ढोपरे
- ४) नरेश वाळके
- सर्व राहणार परळी वैजनाथ

यापैकी दोन आरोपी तापात असून पुढील आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत परळी शहर पोलीस ठाण्यात कलम १०९, ११८(१), ११५(२), ३५२, ३(५) B.N.S. अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक दीपक राठोड हे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. घटनास्थळाला उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेश शिंदे तसेच, पोलीस निरीक्षक नाचन आणि यांनी भेट दिली आहे.

# योगासने आणि प्राणायाम : मानवी जीवनाच्या आरोग्याची गुरुकिल्ली!

प्राचीन भारतीय शास्त्र हे निरोगी जीवनशैली आणि तणाव मुक्तीसाठी अत्यंत उपयोगी राहिले आहे. योगामुळे मन, शरीर यात संतुलन राहते आणि विशेष म्हणजे जागतिक स्तरावर सुद्धा मानवतेमध्ये ऐक्य, बंधुभाव आणि एकतेची भावना वाढीस लागण्यास मदत होते. आज 21 जून अर्थात आंतरराष्ट्रीय योग दिन सर्वत्र साजरा केला जात आहे.

मानवी जीवनामध्ये योगाचे आणि योग दिनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. योगासनामुळे आणि प्राणायामामुळे शरीरामध्ये लवचिकता निर्माण होते. पचनक्रिया आणि तसेच स्नायू बळकट होऊ लागतात.

आजकाल जे विविध रोगराई जसे की मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार यासारखे आजार वाढीस लागले आहेत.. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी नियमित योग केला तर जीवनशैलीत बदल करून आरोग्य सुधारू शकते, असा विश्वास आहे. आजच्या धावपळीच्या जगात योगासने केल्यामुळे



लेखिका
**डॉ.आशाताई फड**
( M.A. B.Ed.TAIT. SET. M.Phil. Ph.D. )

निश्चितच निराशा, ताणतणाव, चिंता दूर होऊ शकते. योग हा कुठल्याही जात धर्म पंथ यासाठी नसून तो अखंड मानव जातीसाठी आहे. केवळ आपला देश नव्हे; तर जगातील लोक एकत्र येऊन योगाच्या माध्यमातून एकतेचा संदेश देऊ शकतात.

योगासने हे आजकालची नवीन पद्धत नाहीये, तर ती भारताची अत्यंत प्राचीन काळातील म्हणजेच चार-पाच हजार वर्षांपूर्वीची एक परंपरा आहे. हीच परंपरा आज जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचल्याचे दिसते. जगातील सर्वांना भारताच्या या परंपरेचे महत्त्व उमजले आहे. या माध्यमातून आपल्या भारताच्या प्राचीन संस्कृतीचा यानिमित्ताने एका अर्थाने प्रसार होत असल्याचा अभिमान वाटतो.

आज 21 जून; अर्थात आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने सबंध भारतातील सर्व वयोगट आणि स्तरातील पिढी निरोगी सशक्त बळकट आणि ऊर्जावान बनावी आणि उद्याचा युवा भारत सक्षम आणि जगात ताठ मानेने उभा राहिलेला असावा, या अपेक्षासह योग दिनाच्या खूप खूप शुभेच्छा..!




# युनिक क्युरियस किड्समध्ये उत्साहात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा




परळी वैजनाथ : युनिक क्युरियस किड्स विद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी मोठ्या आनंदाने आणि उत्स्फूर्तपणे योगासनांमध्ये सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक विकासासाठी विविध सूक्ष्म व्यायाम, प्राणायाम तसेच लहान मुलांसाठी उपयुक्त योगासने शिकविण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांना छोट्या-छोट्या योगा मॅट उपलब्ध करून देण्यात आले होते. योगा मॅटवर बसून विद्यार्थ्यांनी आनंदाने योगाभ्यास केला. योग सत्रादरम्यान विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील उत्साह, ऊर्जा आणि आनंद विशेष लक्षवेधी ठरला.

विद्यालयातील सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व समजावून सांगत त्यांच्याकडून विविध योगासने व प्राणायाम करून घेतले. या उपक्रमामागील मुख्य उद्देश विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे हा होता. शैक्षणिक प्रगतीबरोबरच विद्यार्थ्यांचे शारीरिक स्वास्थ्य, मानसिक एकाग्रता आणि निरोगी जीवनशैली विकसित व्हावी, यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी विद्यालयाच्या संचालिका सौ. पूजा सारडा मॅडम यांनी सांगितले की, “आजची ही चिमुकली मुलेच उद्याचे भविष्य आहेत. त्यामुळे त्यांचे बालपणापासूनच शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम घडणे आवश्यक आहे. योग हा निरोगी आणि संतुलित जीवनाचा पाया असून, मुलांमध्ये आत्मविश्वास, शिस्त आणि सकारात्मकता निर्माण करण्याचे प्रभावी माध्यम आहे.”

उत्साहपूर्ण आणि आरोग्यदायी वातावरणात पार पडलेल्या या योग दिन उपक्रमाला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.